# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी ठाणे यांचे कार्यालय

पत्ता :- १, जिल्हा निवडणूक शाखा, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे प. ४०० ६०१
दुरध्वनी क्रमांक — ०२२ २५४५४१४२ फॅक्स नं. ०२२ — २५३४२१२५
Website — www.thaneelection.com

क्र./निवडणूक/कक्ष-१/टे-३/SVEEP/कावि- ६५/२०२३
दि. ०३/०८/२०२३

प्रति,

उपायुक्त, (निवडणूक) ठाणे महानगरपालिका,
उपायुक्त, (निवडणूक) नवी मुंबई महानगरपालिका,
उपायुक्त (निवडणूक) कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
उपायुक्त (निवडणूक) उल्हासनगर महानगरपालिका,
उपायुक्त (निवडणूक) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,
उपायुक्त (निवडणूक) मिरा भाईंदर महानगरपालिका,

विषय:- 'माझा गणेशोत्सव माझा मताधिकार' स्पर्धेच्या पूर्वतयारीबाबत.

संदर्भ:- अपर मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५४०/२३/ ३३ दि. ३१ जुलै, २०२३

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. गतवर्षीप्रमाणे यावर्षीही गणेशोत्सवामध्ये 'माझा गणेशोत्सव माझा मताधिकार' ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. यंदाच्या स्पर्धेत घरगुती गणेशोत्सव सजावटी सोबतच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनाही या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येणार आहे.

मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेद्वारे प्राप्त स्पर्धेची माहिती सोबत जोडली असून आपलेस्तरावरून सदर कार्यक्रमास प्रसिध्दी देण्यात यावी. आपले महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गणेशोत्सव मंडळांच्या प्रतिनिधींशी तातडीने संपर्क साधून / बैठक आयोजित करून त्यांना स्पर्धेची माहीती समजावून सांगण्यात यावी व स्पर्धेत सहभागी होण्यासंबंधी प्रोत्साहीत करणेत यावे.

AVKadam

(अर्चना कदम)
उपजिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे

प्रत :- श्रीम स्मिता मोहिते,तहसिलदार(SRA) तथा जिल्हा समन्वय अधिकारी (SVEEP) यांना माहितीसाठी.

१३९७
२.११ कावि ६५

# मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.५४७/२३/३३,
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२,
दिनांक :- ३१, जुलै, २०२३.

प्रति,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व.

**विषय :- 'माझा गणेशोत्सव माझा मताधिकार' स्पर्धेच्या पूर्वतयारीबाबत.**

महोदय / महोदया,

आपली सर्व निवडणूक कार्यालये सध्या बीएलओंच्या घरोघरी भेटीच्या मोहिमेत व्यस्त आहेत, याची मला कल्पना आहे. पण, मतदार जागृतीच्या मोहिमेत फक्त आपली यंत्रणा पुरेशी पडेल असे नाही, म्हणून आपण गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षीही गणेशोत्सवामध्ये 'माझा गणेशोत्सव माझा मताधिकार' ही स्पर्धा आयोजित करत आहोत. यंदा १९ ते २८ सप्टेंबर २०२३ या कालावधीत गणेशोत्सव असला तरी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची तयारी आतापासून सुरू झाली आहे. त्यामुळे आपल्याला गणेशोत्सव मंडळांना तातडीने सदर स्पर्धेची माहिती देणे आवश्यक आहे. तरच सप्टेंबरमधील आपल्या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळू शकेल.

यदाही आपण सदर स्पर्धेत घरगुती गणेशोत्सव सजावटीसोबतच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनाही सहभागी करून घेणार आहोत. आपल्या जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पाठवण्यासाठी सोबत स्पर्धेविषयीचे एक टिपण पाठवत आहे. हे टिपण जिल्ह्यातील सर्व गणेशोत्सव मंडळांपर्यंत पोहोचेल अशी व्यवस्था करावी. तसेच जिल्ह्यातल्या मोठ्या गणेशोत्सव मंडळांच्या प्रमुखांची बैठक आयोजित करून त्यांना सदर स्पर्धेची माहिती समजावून सांगावी आणि स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.

सप्टेंबरमध्ये सार्वजनिक आणि घरगुती गणेशोत्सवाची स्पर्धा जाहीर होईल, तेव्हा या स्पर्धेची आणखी सविस्तर माहिती पाठवली जाईल. त्यामुळे सोबत पाठवलेले टिपण हे केवळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी आहे हे लक्षात घ्यावे. तसेच सदर माहिती प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध करावी.

आपला,

(श्रीकांत देशपांडे)
अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत :- उप जिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय
दिनांक : 31/7/2023
आवक क्र. :
उपजिल्हा निवडणूक अधिकारी :
तहसिलदार :
तहसिलदार :
नायब तहसिलदार : 3117
अव्वल कारकून :
कार्यासन क्र. : 13
संकलन लिपीक : 62

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र

गणेशोत्सव देखावा-सजावट स्पर्धा २०२३

# माझा गणेशोत्सव माझा मताधिकार

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी टिपण

दरवर्षी भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थीला महाराष्ट्रातील गणेश भक्तांच्या घरी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये गणेशाचे आगमन होते आणि वातावरण चैतन्याने भरून जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात समाज प्रबोधनासाठी सुरू केलेली सार्वजनिक गणेशोत्सवाची परपरा महाराष्ट्र आजही त्याच हिरिरीने जपतो आहे. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने '**माझा गणेशोत्सव माझा मताधिकार**' या विषयासंबंधी गणेशोत्सव देखावा-सजावट स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेचे हे तिसरे वर्ष आहे.

गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळे प्रबोधनपर देखावे साकार करून सामाजिक संदेश देतात. या स्पर्धेत मंडळांनी देखावे व सजावटीद्वारे मताधिकार बजावण्यासाठी मतदार नोंदणी, मताधिकार, लोकशाहीचे सक्षमीकरण इ. विषयांवर प्रबोधन करता येईल. देखावे-सजावटीसाठी काही ढोबळ विषय पुढीलप्रमाणे आहेत -

१. लोकशाही टिकवण्यासाठी मतदानाला पर्याय नाही!
२. मतदार यादीतला तरुणाईचा टक्का वाढावा म्हणून...
३. आम्ही मतदान करणार, कारण...
४. हक्क वंचितांचे मार्ग मताधिकाराचा
५. शहरी मतदारांची अनास्था – कारणे आणि उपाय

वरील विषय सोयीसाठी दिलेले आहेत, या विषयांपलीकडेही जाऊन आपणांस देखाव्यांतून संदेश देता येतील. मात्र त्यामध्ये लोकशाही, मतदार नोंदणी, मताधिकार यांचे महत्त्व अधोरेखित झाले पाहिजे याची काळजी घेण्यात यावी.

मताधिकार हा १८ वर्षांवरील नागिराकाचा कायदेशीर अधिकार आहे. त्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने आपले नाव मतदार यादीत नोंदवणे आणि मताधिकार बजावणे, मतदार यादीतील दुबार नावे वगळण्यासाठी मतदार ओळखपत्राला आधार कार्ड जोडणे, मताधिकार बजावताना जात, धर्म, पंथ निरपेक्ष राहून आपला लोकप्रतिनिधी निवडणे, पैसे किंवा इतर आमिषांना बळी न पडता मताधिकार बजावणे, यांसारख्या विषयांवर आपल्या देखाव्या-सजावटीतून जागृती करून लोकशाही समृद्ध करता येईल.

पाणी, सार्वजनिक स्वच्छता, खड्डे-मुक्त रस्ते, चांगल शिक्षण, चांगली घरं, अशा अनेक सार्वजनिक सुविधा सर्व नागरिकांना विनासायास प्राप्त होणं, हे सक्षम आणि सुदृढ लोकशाहीचं लक्षण आहे. मात्र नागरिकांना या

सुविधांची केवळ माहिती असून उपयोग नाही, तर या सुविधा मिळवून देण्याची जबाबदारी आपल्या लोकप्रतिनिधींवर आहे आणि ती पार पाडणाऱ्या लोकप्रतिनिधीची निवड करणंही तितकंच आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपला मताधिकार बजावला पाहिजे आणि तो बजावताना पैसे, वैयक्तिक वापराच्या वस्तू, तात्पुरत्या आमिषांना बळी न पडता आपल्या परिसराच्या कायमस्वरूपी विकासाला प्राधान्य दिले पाहिजे. अशा सुजाण नागरिकांनी बजावलेल्या मताधिकारामुळेच लोकप्रतिनिधींवर दबाव निर्माण होईल आणि खऱ्या अर्थाने लोकांनी लोकांची लोकांसाठी चालवलेली लोकशाही व्यवस्था अस्तित्वात येईल. यासारखे संदेशही देखावे व सजावटीच्या माध्यमातून देता येतील.

स्पर्धेचा **गूगल अर्ज आणि काही तांत्रिक नियमावली सप्टेंबरमध्ये पाठवण्यात येईल.**

सार्वजनिक **गणेशोत्सव मंडळांसाठी बक्षिसांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल :**

अ. प्रथम क्रमांक :- एक लाख रुपये

ब. द्वितीय क्रमांक :- एकावन्न हजार रुपये

क. तृतीय क्रमांक :- एकवीस हजार रुपये

ड. उत्तेजनार्थ :- दहा हजार रुपयांची एकूण दहा बक्षिसे

(वि.सू. स्पर्धकांच्या संख्येनुसार आणि दर्जानुसार बक्षिसांच्या संख्येत आणि रकमेत बदल करण्याचा अधिकार आयोजक आणि परीक्षकांचा राहील).

********************